आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२५ जुलै २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- पावसामुळे पुण्यासह राज्यात विविध ठिकाणी जनजीवन विस्कळीत/ पुणे शहराच्या काही भागात NDRF आणि लष्कराकडून बचावकार्य
- अतिवृष्टीमुळं संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना भरीव मदत देण्याची विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांची मागणी
- राज्यातल्या प्रत्येक शासकीय कार्यालयात पात्र उमेदवारांना इंटर्नशीपची संधी उपलब्ध करून देण्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश
- पॅरिस ऑलिम्पिकमधे नेमबाजीच्या रँकिंग फेरीत चौथं स्थान मिळवून भारतीय महिला संघानं केलं उपांत्यपूर्व फेरीतलं स्थान निश्चित

**आणि**

- ख्यातनाम साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्ते फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांचं निधन

**<><><><><>**

राज्याच्या विविध भागांमध्ये आज पावसामुळं जनजीवन विस्कळीत झालं. पुण्याला या पावसाचा सर्वाधिक फटका बसला. खडकवासला धरणातून मुठा नदीपात्रात विसर्ग केल्यामुळे पुणे शहराच्या अनेक वस्त्यांमध्ये पाणी शिरलं. सिंहगड रस्त्यावर एकता नगरमध्ये NDRF आणि लष्कराच्या जवानांनी नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवलं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी परिस्थितीची पाहणी केली. दहावी आणि बारावीच्या ज्या विद्यार्थ्यांना पावसामुळे फेरपरीक्षेला उपस्थित राहता आलं नाही, त्यांची पुन्हा परीक्षा घेतली जाईल, असं त्यांनी वार्ताहर परिषदेत सांगितलं. दुपारी १५ हजार क्युसेकपर्यंत कमी केलेला खडकवासल्याचा विसर्ग संध्याकाळी ६ वाजेपासून पुन्हा ४० हजार क्यूसेक केल्याची माहिती केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली.

**पुणे** जिल्ह्यात गेल्या २४ तासांत पावसामुळे ४ जणांचा मृत्यू झाला असून १२ जण जखमी झाले आहेत. मुंबई ते पुणे दरम्यान धावणाऱ्या डेक्कन क्वीन, इंटरसिटी एक्सप्रेस आणि प्रगती एक्सप्रेस या गाड्यांच्या फेऱ्या रेल्वेनं आज आणि उद्यासाठी रद्द केल्या.

राज्याच्या इतरही भागात झालेल्या पावसानं **मुंबई, पनवेल, पालघर, कल्याण-डोंबिवली** या महानगरपालिका क्षेत्रातल्या आणि **ठाणे**, **पुणे तसंच रायगड** या जिल्ह्यांतल्या शाळांना आज सुट्टी जाहीर झाली होती. **ठाणे शहर** आणि **सातारा** जिल्ह्यातल्या शाळांना आज आणि उद्यासाठी सुट्टी जाहीर झाली आहे**.**

**मुंबई आणि उपनगरात** आज सकाळपासून पडणाऱ्या मुसळधार पावसानं जनजीवन विस्कळीत झालं. पाणी साचल्यानं रस्ते आणि रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाला.

**ठाणे** जिल्ह्यात उल्हास नदीनं धोक्याची पातळी ओलांडली असून, अनेक मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत.

**रायगड** जिल्ह्यातल्या सावित्री आणि अंबा या नद्यांनी धोक्याची पातळी तर कुंडलिका आणि पाताळगंगा या नद्यांनी इशारा पातळी ओलांडली आहे.

**कोल्हापूर** जिल्ह्यात राधानगरी धरणामधून पाण्याचा विसर्ग सुरु झाल्यामुळे पंचगंगा नदीनं धोक्याची पातळी ओलांडली आहे. नदी पात्राजवळच्या गावांमधल्या नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवलं आहे.

**सांगली** जिल्ह्यात वारणा आणि कृष्णा या नद्यांचे पाणी नागरी वस्तीत आल्यामुळे ४० कुटुंबांच स्थलांतर करण्यात आलं आहे. **चंद्रपूर, गडचिरोलीमध्ये** वाहतुकीचे अनेक मार्ग बंद झाले आहेत.

हवामान विभागानं **मुंबई, पुणे, ठाणे, पालघर, रायगड आणि सातारा या** जिल्ह्यांसाठी आज रेड अलर्ट जारी केला आहे. रायगड, रत्नागिरी आणि साताऱ्यात उद्याही रेड अलर्ट आहे.

**<><><><>**

राज्यात ज्या-ज्या ठिकाणी पूरसदृश् परिस्थिती आहे, तिथं बचाव कार्य वेगानं सुरु आहे, मात्र नागरिकांनी देखील आवश्यकता असेल तरच, घराच्या बाहेर पडावं असं आवाहन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं आहे. राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या तुकड्या, लष्कर, नौदल, पोलीस, अग्निशमन दल, आरोग्य यंत्रणा या सर्वांना एकमेकात समन्वय ठेवून आवश्यकतेप्रमाणे मदत करण्याचे निर्देश देण्यात आल्याचंही मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><>**

राज्यात अतिवृष्टीमुळं हजारो हेक्टरवरच्या पिकांचं नुकसान झालं असून अतिवृष्टीमुळं संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना सरकारनं भरीव मदत करावी, अशी मागणी विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज केली. हवामान खात्यानं दिलेल्या अतिवृष्टीच्या अंदाजाच्या पार्श्वभूमीवर ते आज मुंबईत बातमीदारांशी बोलत होते.

अलमट्टी धरणामुळं कोल्हापूर, सांगली या शहरांना पुराचा धोका होऊ नये, यासाठी काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांनी कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांची आणि उपमुख्यमंत्र्यांची भेट घेऊन विस्तृत चर्चा केली आहे, अशी माहिती वडेट्टीवार यांनी दिली. नागरिकांनी जीव धोक्यात घालून घराबाहेर पडू नये, असं आवाहनही त्यांनी केलं.

**<><><><>**

राज्यातल्या प्रत्येक शासकीय कार्यालयात पात्र उमेदवारांना इंटर्नशीपची संधी उपलब्ध करून देण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. त्यांनी आज दूरदृष्यप्रणालीद्वारे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा आढावा घेतला. त्यावेळी ते बालत होते. मंजूर पदाच्या कमीत कमी पाच टक्के, किंवा

किमान एका उमेदवाराला प्रशिक्षणाची संधी मिळेल यादृष्टीनं साठी नियोजन करावं, असं त्यांनी सांगितलं.

उद्योग, कौशल्य विकास यांच्यासह सहकार, उच्च आणि तंत्रशिक्षण, बंदर विकास, परिवहन यांच्यासह सर्वच विभाग आणि यंत्रणांनी समन्वयानं योजनेची अंमलबजावणी करावी असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत राज्यातली पहिली नियुक्ती गडचिरोली जिल्ह्यातल्या सोनाली गेडाम या युवतीला मिळाली आहे.

<><><><><>

आगामी विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेना २२५ ते २५० जागा लढवणार असून त्यादृष्टीनं येत्या १ ऑगस्ट पासून राज्याचा दौरा करणार असल्याची माहिती, पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज मुंबईत कार्यकर्ता मेळाव्यात दिली. यावेळी त्यांनी राज्य सरकारच्या लाडकी बहीण योजनेवर टीका केली.

<><><><><>

पॅरिस ऑलिम्पिकच्या उदघाटन समारंभाच्या एक दिवस आधी, आज भारतानं शानदार कामगिरीनं सुरुवात केली. नेमबाजीमध्ये भारतीय महिला संघानं रँकिंग फेरीत चौथं स्थान मिळवून उपांत्यपूर्व फेरीत आपलं स्थान निश्चित केलं. भारतीय तिरंदाज तरुणदीप राय आणि प्रवीण जाधव यांच्यासह दीपिका कुमारी, अंकिता भकट, भजन कौर, आणि बी. धीरज यांनी वैयक्तिक रँकिंग फेरीत भाग घेतला.

उपांत्यपूर्व फेरीत, भारताचा सामना यजमान फ्रान्स आणि नेदरलँड यांच्यात अंतिम-१६ टप्प्यात झालेल्या सामन्यातल्या विजेत्याबरोबर होईल. पुरुषांच्या वैयक्तिक स्पर्धेत धीरज बोम्मादेवरा, तरुणदीप राय आणि प्रवीण जाधव भारताचं

प्रतिनिधित्व करतील. स्पर्धेचे उर्वरित टप्पे २८ जुलै ते ४ ऑगस्ट या कालावधीत होणार आहेत. रँकिंग फेऱ्यांनंतर, स्पर्धा मॅचप्लेच्या टप्प्यात प्रवेश करेल.

पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये तिरंदाजीच्या पाचही स्पर्धांमध्ये भारत सहभागी होणार आहे. स्पर्धेसाठी भारताचे एकूण १२८ तिरंदाज पात्र ठरले.

पॅरिस ऑलिम्पिकचा उदघाटन सोहळा भारतीय वेळेनुसार उद्या रात्री ११ वाजता सुरु होईल.

**<><><><><>**

ख्यातनाम साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्ते फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांचं आज वसई इथं वार्धक्यानं निधन झालं. ते ८२ वर्षांचे होते.

फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांनी ९३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद भूषविलं होतं. आनंदाचे अंतरंग - मदर तेरेसा, ओॲसिसच्या शोधात, ख्रिस्ताची गोष्ट, तेजाची पाऊले, मुलांचे बायबल, सृजनाचा मळा ही फ्रान्सिस दिब्रिटो यांची पुस्तकं, तसंच 'नाही मी एकला' हे त्यांचं आत्मचरित्र प्रसिद्ध आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, काँग्रेस नेते नाना पटोले यांनी फादर दिब्रिटो यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि सोलापूर इथं कांदा महाबँक सुरू करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले. सह्याद्री अतिथीगृहात कांदा महाबँक प्रकल्पाचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली, त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले. कांद्यावर अणुऊर्जेद्वारे विकिरण प्रक्रिया करून कांद्याची साठवणूक करता येईल. या बँकेमुळे शेतकऱ्यांना फायदा होणार आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. या बँकेसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पणन, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या जागांचा वापर करण्यात यावा, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

''एसटी पास थेट तुमच्या शाळेत'' योजनेला चांगला प्रतिसाद मिळत असून गेल्या महिन्यात ४ लाखापेक्षा जास्त विद्यार्थ्यांना पास मिळाले आहेत. १८ जूनला ही योजना सुरु झाली. त्यानंतर केवळ १२ दिवसात ४ लाख ३ हजार २९४ विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेत जाऊन एसटी कर्मचाऱ्यांनी प्रवास पास वितरित केले. ही संख्या गेल्या वर्षीच्या जून महिन्याच्या तुलनेत सुमारे ८३ हजारांनी जास्त आहे. तसंच उत्पन्नही २६ कोटी रुपयांनी वाढलं आहे. जुलै महिन्यातही अशाच पद्धतीनं एसटी कर्मचारी थेट शाळेत जाऊन पास वितरित करत असल्याचं एसटी महामंडळाच्या प्रसिद्धिपत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

जुलै महिन्यात पडलेल्या दमदार पावसामुळे मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही तलावांच्या पाणीसाठ्यामध्ये ६६ टक्क्यापेक्षा जास्त भर पडली आहे. तुळशी, तानसा, विहार आणि मोडकसागर हे जलाशय पूर्ण क्षमतेनं भरले आहेत. या पार्श्वभूमीवर, मुंबईत  सध्या लागू असलेली १० टक्के पाणी कपात येत्या २९ जुलै पासून मागे घेण्याचा निर्णय महानगरपालिका प्रशासनानं घेतला आहे.

**<><><><><>**

संपूर्ण राज्यात मान्सून सक्रीय असून गेल्या चोवीस तासात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात अतिशय जोरदार पाऊस पडला. विदर्भात काही ठिकाणी जोरदार, तर तुरळक ठिकाणी अतिशय जोरदार पाऊस पडला.

येत्या चोवीस तासात राज्यातल्या चारही विभागांमधे बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिशय जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

***//<><><><><>//***